# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०४/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २९/०४/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांचे आदेशाने स्टाफ पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना संग्रामपूर शिवार रामटेक येथे स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच–४०/सी. क्यु– ८०१३ ट्रॉली हा येतांना दिसला. त्याला थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये चालक **आरोपी नामे– संतोष सोहम लिमजे, रा. काचूरवाही** हा त्याचा ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती किंमती ३०००/–रू. वाहतूक करतांना मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीकडुन_स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच–४०/सीक्यु– ८०१३ ट्रॉली किंमती ८,६०,०००/–रू. मध्ये १ ब्रास रेती किंमती ३०००/–रू. चोरी करून वाहतूक करतांना मिळून आल्याने वाहनासह एकुण किंमती ८,६३,०००/– रू. चा मुददेमाल जप्त करून सदर ट्रॅक्टर चालक **आरोपी नामे– १) संतोष सोहम लिमजे, रा. काचूरवाही व मालक २) संजय बिच्चूलाल दमाहे, रा. चिचाळा ता. रामटेक जि. नागपूर** यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. रामटेक येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली नापोशि अनिल सपाटे, पोलीस अंमलदार सचिन गेडाम यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर